# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
# (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी क्रमांक :—
२५६०१२६६
२५६०१२७२
e-mail : dyrelg@unipune.ac.in

शैक्षणिक पात्रता विभाग
गणेशखिंड, पुणे— ४११००७

---

संदर्भ क्रमांक शै. पा./221

दिनांक - 24/08/2018

प्रति,
प्राचार्य/ संचालक,
सर्व संलग्नित महाविद्यालये आणि मान्यताप्राप्त संस्था,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.

**विषय - शैक्षणिक पात्रतेचे कामकाज करणा-या कर्मचा-यांना ४० टक्के रकमेचा परतावा मिळणेबाबत.....**

महोदय/महोदया,

शैक्षणिक पात्रता विभागामार्फत सर्व महाविद्यालयांसाठी या वर्षीदेखील जिल्हानिहाय शैक्षणिक पात्रतेच्या प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते. सर्वच महाविद्यालयांतील शैक्षणिक पात्रतेचे कामकाज पाहणा-या कर्मचा-यांनी सदर प्रशिक्षणाचा लाभ घेतलेला आहे. विद्यापीठ अधिकार मंडळाने यापूर्वीच घेतलेल्या निर्णयानुसार शैक्षणिक पात्रता शुल्कापोटी जमा होणा-या रकमेपैकी ६० टक्के रक्कम विद्यापीठाकडे जमा होते व उर्वरित ४० टक्के रक्कम (विलंब शुल्क आणि अतिरिक्त विलंबशुल्क वगळता) महाविद्यालयांनी शैक्षणिक पात्रतेचे कामकाज करणा-या कर्मचा-यांना (४० टक्के रकमेपैकी ५ टक्के रक्कम प्राचार्य/संचालक यांच्यासाठी) देण्याबाबत तरतूद केलेली आहे. परंतु पात्रतेचे कामकाज करणा-या सेवकांना काही महाविद्यालयांकडून सदर रक्कम मिळत नसल्याबाबत निदर्शनास आणून दिले आहे.

तरी आपणांस विनंती करण्यात येते की, शैक्षणिक पात्रतेचे काम करणा-या सेवकांना वरीलप्रमाणे रक्कम देण्याबाबत काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

कळावे,

आपला,

(स्वाक्षरी)

उपकुलसचिव
शैक्षणिक पात्रता विभाग